केंद्र पुरस्कृत मृद आरोग्य पत्रिका या योजनेंतर्गत सन २०१६-१७ चा अखर्चित निधी वितरीत करणेबाबत. **(लेखाशिर्ष २४०२ A०८६ )**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी- २०१७ / प्र.क्र. ११ / कार्यासन .६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख:- ०३ नोव्हेंबर, २०१७.

वाचा -

१) शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७
४) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र. पुरक- २५१७ / प्र. क्र. ११९ / १७-अे.

**शासन निर्णय-**

राज्यात केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत मृद आरोग्य पत्रिका या योजनेंतर्गत् मागणी क्र. टी-६, २४०२, मृद व जलसंधारण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०२) कृषि उन्नती योजना-मृद आरोग्य पत्रिका ( केंद्र हिस्सा ६० टक्के ) लेखाशिर्ष २४०२ A०८६ या योजनेखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रु.२२४.७२ लाख इतका निधी पुरवणी मागणी अन्वये अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाने उपरोक्त योजनेंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात वितरीत केलेला रु. ५५.७३ लाख इतका निधी अखर्चित राहिलेला आहे. त्यानुषंगाने कृषि व पदुम विभागाच्या वाचा क्र. ४ येथील प्रस्तावास अनुसरुन मागणी क्र. टी-६, २४०२, मृद व जलसंधारण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०२) कृषि उन्नती योजना-मृद आरोग्य पत्रिका ( केंद्र हिस्सा ६० टक्के ) लेखाशिर्ष २४०२ A०८६ या योजनेखाली सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अखर्चित राहिलेला रु. ५५.७३ लाख ( अक्षरी रुपये पंचावन्न लाख त्र्याहत्तर हजार फक्त ) इतका निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीमधून प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. प्रकरणी नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय /उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची

दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १२९ /अर्थ-१९/१७, दि. १३-१०-२१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत असून उपरोक्त शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची कृषि व पदुम विभागाने खात्री करावी.

६ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०११६०१२६८२२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2017.11.03 11:08:27 +05'30'

**( रविंद्र दि. औटे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव ( कृषि ) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. वित्त विभाग ( अर्थसंकल्प- १९ ), मंत्रालय, मुंबई.
६. कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.
७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.
८. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग